# <u>उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी कार्यालय यांचे नागपूर(ग्रामिण)</u>

Email Id – sdonagpur@yahoo.in Phone No. 0712-2520645

**क्र.अ.का./भू.सं./उविअ.नाग.(ग्रा.)/कावि- /२०२०, दिनांक:- /०६/२०२०**

---

**<u>अत्यंत महत्वाचे</u>**
**<u>तात्काळ</u>**

**<u>प्रति,</u>**

व्यवस्थापक,
एन.आय.सी.,
नागपूर.

**विषय :-** भुमि संपादन,,पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये कलम ११ (१) खालील अधिसुचना मा.जिल्हाधिकारी,नागपूर यांचे वेबपोर्टल (WWW.nagpur.nic.com) वर तात्काळ प्रसिध्द करणेबाबत.
मौजा-भोकारा भुसंपादन प्रकरण क्र.१२/अ-६५/२०१८-१९.

**संदर्भ :-** उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,नागपूर(ग्रामिण) यांची अधिसुचना क्र.अ.का./भू.सं./उविअ.नाग.(ग्रा.)/कावि- /२०२०, दिनांक:- /०६/२०२०, दिनांक-

यासोबत जोडलेली, मौजा-भोकारा भुसंपादन प्रकरण क्रमांक १२/अ-६५/२०१८-१९ प्रकरणातील भुमि संपादन, पुर्नवसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अन्वये कलम ११ (१) खालील अधिसुचना मा.जिल्हाधिकारी,नागपूर यांचे वेबपोर्टल (WWW.nagpur.nic.com) वर तात्काळ त.करण्यात यावी हि विनंती.

**सहपत्र :-** PDF Format.

(इंदिरा चौधरी)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी,
नागपूर(ग्रामिण)

**प्रतिलिपी :-**

उपमुख्य इंजिनियर (निर्माण) मध्य रेल्वे, नागपूर यांना माहिती करीता अग्रेषित.

(इंदिरा चौधरी)
उपविभागीय अधिकारी तथा
भुसंपादन अधिकारी,
नागपूर(ग्रामिण)

# अधिसुचना

**उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी**
**नागपूर(ग्रामिण) यांचे कार्यालय, नागपूर**
**दिनांक :-      /०६/२०२०.**

**भुमीसंपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचीत भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८ अन्वये ११ (१) खालील अधिसुचना**

**क्र.अ.का./भू.सं./उविअ.नाग.(ग्रा.)/कावि-        /२०२०, दिनांक:-    /०६/२०२०**

ज्याअर्थी, भुमी संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचीत भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण.११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसुचना" असा करण्यात आलेला आहे.) याव्दारे असे अधिसुचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमिन" असा करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी. ( यात यापुढे ज्याचा निर्देश "सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे. अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी, आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेल्या आहेत. ( विस्थापन होणार असेल तर या अनुसूची मध्ये कारणे नमुद करावीत ):

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये, पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमुद करावा:)

त्याअर्थी आता, असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल, त्या कालावधी पर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रर्वतनातुन सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आलेला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भुमि अभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, नागपूर यांनी उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी श्रीमती इंदिरा चौधरी,उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,नागपूर(ग्रामिण) यांना पदनिर्देशित केले आहे.

## अनुसूचि – एक

## जमिनीचे वर्णन

**गाव :- भोकारा, प.ह.नं.१२, तालुका- नागपूर(ग्रामिण), जिल्हा – नागपूर**

**भुसंपादन प्रकरण क्रमांक :- १२/अ-६५/२०१८-१९**

| अ.क्र. | सर्वे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादना खालील क्षेत्र (अदमासे) हे.आर. |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | १२६/१ | ०.०३३८ |
| **एकुण** | | **०.०३३८** |

## अनुसूची – दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नांव | :- | ईटारसी - नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकाम |
| प्रकल्प कार्याचे वर्णन | :- | ईटारसी - नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकामाबाबत |
| समाजाला मिळणारे लाभ | :- | ईटारसी - नागपूर तिसरी रेल्वे लाईनचे बांधकाम भारतीय रेल्वे अंतर्गत असुन योजनेची वाहतुक/रहदारी क्षमता वाढविण्याची उद्यीष्ट साध्य करणेसाठी उक्त रेल्वे लाईनचे बांधकाम पुर्ण करणे आवश्यक आहे. |

## अनुसूची – तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापीत होत नाही.

## अनुसूची – चार

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-

भुमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १०(क) अन्वये महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग मंत्रालय,मुंबई यांची अधिसुचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागु करण्यापासून सुट देण्यात आली आहे.

## अनुसूची – पाच

## नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| अ. | प्रशासक म्हणुन नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम | :- | **निरंक** |
| आ. | प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता | :- | **निरंक** |
| इ. | ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील | :- | **निरंक** |

**टिप** :- उक्त जमिनीच्या आराखडयाचे उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,नागपूर(ग्रामिण) यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

**दिनांक :- /०६ /२०२०**

**ठिकाण :- नागपूर.**

**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी,**
**नागपूर(ग्रामिण)**